# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED**

PH.NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैमअं/किभांवि/दरपत्रके मागणी/ 11096 /२०२१ दिनांकः- 17/१२/२०२१

**Quotation Order**

विषय :- व्हायरल लोड लॅबसाठी दैनंदिन वापराकरीता लागणाऱ्या कंझ्युमेबल्स साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत.

संदर्भ :-१. प्राध्यापक व विभाग प्रमुख सुक्ष्मजीवशास्त्र विभाग यांचे मागणीपत्र क्र. ५८८ दि.०४.१०.२०२१
२.दि.१०.१२.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील प्राध्यापक व विभाग प्रमुख सुक्ष्मजीवशास्त्र विभागांतर्गत व्हायरल लोड लॅबसाठी दैनंदिन वापराकरीता लागणाऱ्या कंझ्युमेबल्स साहित्यांचे दरपत्रक सोबत जोडण्यात आलेल्या साहित्यांच्या यादीप्रमाणे सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार सीलबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 23/१२/२०२१ रोजी दुपारी ०५:०० वा.पर्यंतच असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 24/१२/२०२१ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | व्हायरल लोड लॅबकरीता आवश्यक साहित्यांचे नाव | नग संख्या | किंमत |
|---|---|---|---|
| .. | पान क्र.२ वर अ.क्र.०१ ते अ.क्र.०८ प्रमाणे साहित्यांची यादी देण्यात आलेली आहे. | ०८ नग | .. |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

२. दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

३. दरपत्रका सोबत शासनमान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत,सन २०२०-२१ या वर्षाचे आयटीआर प्रमाणपत्र जोडण्यात यावे तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना पान क्र. ०३ वर देण्यात आलेला आहे.)

४. दरपत्रकातील साहित्यांच्या दरात जीएसटी कर समाविष्ठ करण्यात आला आहे किंवा अतिरिक्त आकारला जाणार आहे याबाबत नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकातील दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

५. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

६. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

७. पुरवठा करण्यात येणारे साहित्य पुरवठा दिनांका पासुन पुढील एक वर्ष वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील तसेच रद्द करण्यात आलेल्या आदेशाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

८. तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरण नाकारण्यात येतील व याबाबत कसल्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

९. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रतः- १.प्रभारी एच.एम.आय.एस. यांना आदेशित करण्यात येते की,सदरचे दरपत्रके मागणी आदेश व साहित्यांची यादी संस्थेच्या वेबसाईटवर प्रदर्शित करावी तसेच प्रदर्शित केलेल्याबाबत छायांकीत प्रत किरकोळ भांडार विभागास देण्यात यावी.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

व्हायरल लोड लॅबकरीता दरपत्रके मागविण्यात येणाऱ्या आवश्यक साहित्यांची यादी खालील प्रमाणे

| Sr.no. | Name of the Item | Packing size | Qunt. | Rate |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 ml Aerosol Barrier Pipette Tips | 1000 nos./01 pack | 01 Pack | -- |
| 02 | 05 % Hypochlorite Solution | 05 liter/01 Can | 01 Can | -- |
| 03 | Microcentrifuge tube (01.5 ml) | 1000 nos./01 pack | 01 Pack | -- |
| 04 | Lint free KIM Wipe (Large size) | 100 nos./01 pack | 01 Pack | -- |
| 05 | Cryo Vials (01.5 ml) | 500 nos./01 pack | 01 Pack | -- |
| 06 | Cryobox (01.5 ml) | 01 nos. | 01 nos. | -- |
| 07 | Aluminium Foil Roll | 01 nos. | 01 nos. | -- |
| 08 | Nitrile Gloves (6.5 Med. Size) | 100 nos./01 pack | 01 pack | -- |

DEAN
SRTRGMC, AMBAJOGAI

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

दरपत्रक धारकाचे नाव :-

ठिकाण :-

संपुर्ण पत्ता :-

मो.नं. :-